**विशेष दिवाणी मुकदमा नं. ६८/२०१२ नि. ३४० वरील आदेश**

**(सुर्यकांत सुतार वि. शरद जाधव)**

**(CNR N0.MHSN020007952012)**

१. वादी यांनी निशाणी क्रमांक १५६/२, १५६/३, १५६/५, १५६/६, १५६/७, १५६/२८ ही कागदपत्र शाबीत झालेली आहेत असे प्रतिपादन करुन त्यांना निशाणी क्रमांक देण्यात यावी अशी मागणी प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे.

२. वादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी दावा चालु असताना प्रतिवादी यांना भारतीय पुरावा कायदा कलम ६६ प्रमाणे अर्जात नमुद केलेली कागदपत्र दाखल करावीत म्हणुन नोटीस दिलेली होती. पंरतु सदरची नोटीस देऊन देखील संबंधीत कागदपत्र प्रतिवादी यांनी केसकामी दाखल केलेली नाहीत. त्यामुळे सदरहु कागदपत्र ही शाबीत झालेली आहेत असे प्रतिपादन करुन त्यांना भारतीय पुरावा कायदयाप्रमाणे proved documents असे म्हणुन निशाणी क्रमांक देण्यात यावी अशी वादी यांनी मागणी केलेली आहे.

३. सदरहु अर्जाला अनुषंगून प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दाखल कागदपत्र ही झेरॉक्स कॉपीज आहेत. त्यामुळे ती कागदपत्र शाबीत झाल्याखेरीज त्यांचा विचार करता येणार नाही. सबब त्यांनी वादींचा अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

४. सदरहु अर्जाला अनुषंगून मुळ दाव्याचे अवलोकन केले. वादी यांनी मुळ दावा खरेदीपत्र रद्द होवुन मिळण्यासाठी, निरंतर ताकीदीकरीता, वैकल्पीकरित्या कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

५. सदरहु अर्जाचा गुणदोषावर ऊहापोह करण्यापुर्वी, अत्यंत महत्वपुर्ण बाब म्हणजे, सदरहु दावा हा वेळोवेळी मा.जिल्हा न्यायालय यांनी Time bound केलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा दिनांक २१/०३/२०१२ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. सदरचा दावा हा ११ वर्षे इतका जुना आहे.

६. वादी यांनी दिनांक ३१/०१/२०२२ रोजी निशाणी क्रमांक ३१८ कडे पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केलेला होता. त्यानंतर सदरहु प्रकरणामध्ये प्रतिवादी यांचा साक्षीपुरावा दिनांक ३१/१०/२०२३ रोजी पुर्णपणे संपला. त्यामुळे त्याचदिवशी प्रकरण अंतिम युक्तिवादासाठी लागण्याची स्टेज असताना वादी यांनी प्रस्तुतचा वर नमुद कागदपत्रांना निशाणी देण्याचा अर्ज दिलेला आहे.

७. अर्जाला अनुषंगून उभय बाजुंचा युक्तिवाद ऐकला. निशाणी क्रमांक १५६/२, १५६/३, १५६/५, १५६/६ या कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरहु कागदपत्र हे झेरॉक्स स्वरुपाची आहेत. वादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी संबंधीत कागदपत्रांच्या अस्सल प्रती प्रतिवादी यांनी दाखल कराव्यात म्हणुन त्यांना नोटीस दिलेली होती. परंतु, जर प्रतिवादी यांनी संबंधीत कागदपत्र सादर केलेली नसतील तर ती कागदपत्र दुय्यम पुरावा म्हणुन पुराव्यामध्ये वाचण्यात यावीत असे प्रतिपादन वादी यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये का केले नाही ? याचे समाधानकारक स्पष्टीकरण वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये कोठेही केले नाही.

८. अत्यंत गंभीर बाब म्हणजे, वादी यांचा पुरावा दिनांक ३१/०१/२०२२ रोजी संपलेला आहे अशा आशयाची पुरसीस देताना संबंधीत कागदपत्रांना निशाणी क्रमांक दिलेली नाहीत ही बाब वादी यांनी का विचारात घेतली नाही ? अगर त्या गोष्टीकडे त्यांचे कसे दुर्लक्ष झाले ? याबाबतदेखील समाधानकारक खुलासा वादी यांनी

त्यांच्या अर्जात कोठेही केलेला नाही.

९. सदरहु दावा हा ११ वर्षे जुना आहे व आता अंतिम युक्तिवादासाठी प्रस्तुतचा अर्ज निकाली केल्यानंतर नेमला जाणार आहे. त्या Flag end स्टेजला अर्जात नमुद केलेल्या कागदपत्रांना proved documents म्हणुन निशाणी क्रमांक देण्यात यावी अशी मागणी वादी यांनी केलेली आहे.

१०. निशाणी क्रमांक १५६/२, १५६/३, १५६/५, १५६/६ या कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरहु कागदपत्र ही झेरॉक्स प्रती आहेत. परंतु, प्रतिवादी वकीलांनी सदरहु कागदपत्रांना आर्टीकल देण्यास हरकत नाही असे युक्तिवादादरम्यान तोंडी प्रतिपादन केले. त्यामुळे निशाणी क्रमांक १५६/२, १५६/३, १५६/५, १५६/६ कडील कागदपत्रांना अनुक्रमे आर्टीकल A, B, C, D दिल्यास कोणावरही अन्याय होणार नाही.

११. अर्जात नमुद निशाणी क्रमांक १५६/७ कडे दिनांक २७/०८/२०११ रोजीचा दैनिक तरुण भारत हे वृत्तपत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे सदरहु वृत्तपत्राला निशाणी क्रमांक देणे आवश्यक ठरते.

अर्जात नमुद निशाणी क्रमांक १५६/२८ कडे दिनांक १७/१०/२०११ रोजीचा दैनिक पुढारी या पेपरमध्ये दिलेली जाहीर उत्तरी नोटीस दाखल करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरहु वृत्तपत्राला निशाणी क्रमांक देणे आवश्यक ठरते.

अशापरिस्थितीत, दोन अस्सल कागदपत्रांना म्हणजेच पेपरला निशाणी देणे गरजेचे आहे असे वादी यांना शाबीत करता आलेले आहे. परंतु, निशाणी क्रमांक १५६/२, १५६/३, १५६/५ व १५६/६ ही कागदपत्र झेरॉक्स असल्यामुळे त्यांना

केवळ आर्टीकल देणे आवश्यक ठरते. त्यामुळे वादी यांचा अर्ज अंशतः मंजुर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, आदेश खालीलप्रमाणे –

## आदेश

१. वादी यांचा नि.क्र. ३४० कडील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. निशाणी क्रमांक १५६/७ व १५६/२८ कडील वृत्तपत्रांना अनुक्रमे निशाणी क्रमांक ३४२ व ३४३ देण्यात येत आहे.

३. निशाणी क्रमांक १५६/२, १५६/३, १५६/५ व १५६/६ या दस्तांना proved documents म्हणुन निशाणी क्रमांक देण्याची वादीची मागणी फेटाळण्यात येत आहे.

४. निशाणी क्रमांक १५६/२, १५६/३, १५६/५ व १५६/६ या दस्तांना अनुक्रमे आटीकल A, B, C, D देण्यात येत आहे.

५. सदरहु केस ही मा. जिल्हा न्यायालय यांनी Time bound केलेली आहे, तसेच ती आता अंतिम युक्तिवादाकरीता नेमण्यात आलेली आहे, त्यामुळे उभय पक्षकारांनी कोणतीही तारीख न घेता सदरहु केसमध्ये विनाखंड युक्तिवाद करावा असे त्यांना निर्देशित करण्यात येत आहे.

६. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबद्दल आदेश नाही.

७. उभय पक्षकारांनी हुकूमाची नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale
Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2023.12.02 17:22:53 +0530

**सांगली.** **(अभय अ. मेहेंदळे)**

**दिनांकः ०२/१२/२०२३** **दुसरे सह–दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | श्रीमती आर.व्ही.जाधव, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | ०२/१२/२०२३ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | - | ०२/१२/२०२३ |